● मंगळवार, दि. २५ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २०७ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४   8390098886   yuva.aadarsh@gmail.com   8390048886

जीवनज्योती हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/   https://youtube.com/@Yuva_Aadarsh/   https://twitter.com/Yuva_aadarshjln/   RNI: MAHMAR/2019/78282

# संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये योजनेत 'स्पेशल' उपचार

**दीपक शेळके**

**जालना** - येथील संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजनेतंर्गत केल्या जाणारे उपचार हे 'स्पेशल' अतिरिक्त पैसे घेऊन करण्यात येत आहे. सात हजार, दहा हजार, पंधरा हजार... उपचार आणि योजना यावर हे अतिरिक्त दर ठरलेले आहे. त्यातल्या त्यात कुणी 'स्पेशल' ओळख घेऊन आल्यास त्यास तीन-पाच हजारांची सवलतही या हॉस्पीटल प्रशासनाकडून दिली जाते. महत्त्वाचे म्हणजे वर्षभरापुर्वीच या हॉस्पीटलला नॅशनल ॲक्रेडेशन प्रोव्हायडल मानांकन प्राप्त झालेले आहे. एनएबीएच ही क्लिनिकल गुणवत्ता, रुग्णाची सुरक्षा आणि नवोपक्रम चालविते व आरोग्य सेवांना प्रमाणित करते.

संजीवनी या शब्दाचा अर्थ अमरत्व अथवा जीवन देणारा असा होतो. मात्र, याच नावाने सुरु असलेल्या मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांचा खिसा कापून एक प्रकारे जीव घेण्याचा प्रकार सुरु आहे. हॉस्पीटलने त्यांच्या प्रायव्हेट उपचाराचा खर्च किती घ्यावा हा त्यांचा विषय आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजना अथवा इतर योजनेत रुग्ण असल्यास त्यास निव्वळ मोफत उपचार मिळणे अपेक्षित असते. असे असतांना योजना मंजुर झाल्यानंतरही 'स्पेशल' युक्ती वापरून चांगले स्ट्रेंथ, चांगले रॉड, चांगला बॉऊल, चांगले पॅनल आदी विविध उपचार पद्धतीतील साहित्य वापरण्यासाठी दर्जेदार साहित्य रुग्णांच्या भल्यासाठी चांगल्या आरोग्यासाठी वापरणे आवश्यक असल्याचे रुग्णांच्या नातेवाईकास पटवून देत त्यांच्याकडून अतिरिक्त पैसे उकळण्यात येत आहे. याचाच अर्थ शासनाकडून योजनेत देण्यात येणारे उपचार साहित्य हे हलक्या दर्जाचे आहे असेच या डॉक्टरांना म्हणायचे, असेच म्हणावे लागेल.

संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये सहा दिवसांपुर्वी एक रुग्ण रात्रीच्यावेळी दाखल करण्यात आला होता. या रुग्णाच्या डोक्याला मार व हाताला मार लागलेला होता. उपचार सुरु होते. रुग्णाला महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घ्यायचा होता. तो या योजनेचा निकष पुर्ण करत होता. हॉस्पीटल प्रशासनाने सदरील रुग्णास दोन-तीन दिवसांनंतर या योजनेचा लाभ देण्यास सुरुवात केली. तत्पुर्वी रुग्णांच्या नातेवाईकाकडून १५ हजार रुपये गजानन गजपाल या व्यक्तीच्या माध्यमातून भरवून घेतले. नातेवाईक व रुग्णास कुणी विचारल्यास योजनेत मोफत उपचार होत असल्याचे सांगणे याबाबत कळविण्यात आले. रुग्णाची परिस्थिती पाहत नातेवाईकांने पैसे भरून सर्व बाबींना होकार दिला. रुग्णाचे हित पाहत नातेवाईकांनी हा निर्णय घेतला होता. डिचार्जच्या दिवशी म्हणजेच सोमवार (दि २४) रोजी नातेवाईकाने योजनेचे जालना जिल्हा समन्वयक यांच्याकडे रितसर तक्रार केली. या तक्रारीनंतर हॉस्पीटल प्रशासन खडबडून जागे झाले. रुग्ण व नातेवाईकाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. 'स्पेशल' ओळखीकडून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. यावरही रुग्ण अद्याप बरा झालेला नाही. त्याला पुढे उपचाराची गरज आहे. असे म्हणत एक प्रकारे धमकावण्याचाच प्रयत्न या हॉस्पीटल प्रशासनाकडून करण्यात आला. याची खातरजमा करण्यासाठी संबंधीत नातेवाईकाच्या मोबाईल क्रमांकावर साडेतीन ते चार-पाच वाजेदरम्यान आलेले सर्व कॉलची हिस्ट्री तपासता येईल.

केवळ एवढेच एक प्रकरण नाही तर इतरही वेगवेगळे रुग्ण हॉस्पीटलमध्ये उपचार घेत आहेत. त्यांचे नातेवाईकही याच पद्धतीने त्रस्त आहेत. मात्र, तक्रार करण्यास कोणी धजावत नाही. कारण त्यांना त्यांच्या रुग्णांची काळजी आहे. तक्रार केल्यास डॉक्टरांकडून घात होण्याची शक्यता त्यांच्या डोक्यात घर करुन बसलेली आहे. आयसीयुमध्ये असलेल्या एका पेशंटला योजनेत असतांना इंजेक्शनसाठी अतिरिक्त खर्च लागत आहे. सीटी स्कॅन, रक्त तपासणी, एक्सरे अशा विविध तपासण्या योजनेत बसत नसल्याचे सांगूनही अतिरिक्त पैसे उकळण्यात येत आहे. दोन-तीन दिवस हॉस्पीटल खर्च आणि नंतर योजनेत बसविणे हा प्रकार तर अनेक रुग्णांसोबत होत असल्याची प्रचिती योजनेचे जिल्हा समन्वयक व शासनाने हॉस्पीटलची तपासणी केल्यास येईल. अमरत्व अथवा जीवन देणारा असा अर्थ होणाऱ्या या संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलची चौकशी करुन अशा 'स्पेशल' अन् 'स्पेशल' उपचाराचा शासनाने बंदोबस्त करावा अशी मागणी रुग्णांच्या त्रस्त नातेवाईकांकडून होत आहे.




## नक्कीच कारवाई करू - जिल्हा समन्वयक डॉ. सानप

तक्रारीची दखल घेतल्या गेली असून या प्रकाराची चौकशी करण्यात येणार असल्याचे योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. सचिन सानप यांनी युवा आदर्शशी बोलतांना सांगितले. रुग्णांच्या नातेवाईकांनी घाबरून न जाता अतिरिक्त पैसे घेत असल्यास त्याची तक्रार हॉस्पीटलमध्ये असलेल्या आरोग्य मित्रांकडे करण्याचे आवानही त्यांनी यावेळी केले.

## तक्रार करू... पण नाव गुपित ठेवा - एका रुग्णाचे नातेवाईक

हॉस्पीटलमध्ये योजनेव्यतिरिक्त पैसे घेत असल्यास अथवा इतर काही अडचण असल्यास यासंबंधी नातेवाईकांची तक्रार करण्याची इच्छा जरी झाली तरी तक्रार करण्याची हिंमत होत नसल्याचे एका रुग्णाच्या नातेवाईकाने युवा आदर्शशी बोलतांना सांगितले. त्या नातेवाईकाच्या मते योजनेच्या जिल्हा समन्वयकांनी अथवा शासनाने या संबंधी तक्रारदाराचे नाव शंभर टक्के गुपित ठेवण्याची हमी द्यायला हवी. मात्र, असे काही प्रावधान नाही. त्यामुळे हॉस्पीटल प्रशासनाला तक्रार कुणी केली हे लगेच लक्षात येते व त्यानंतर ते सारवासारव करण्यासाठी गाव एकत्र करतात. त्यामुळे हॉस्पीटल प्रशासनाची तक्रार करावयाची झाल्यास नाव गुपित ठेवण्यात यायला हवे जर असे झाले तरच हॉस्पीटलचे सर्व काळे-पांढरे धंदे बाहेर येतील असा विश्वासही या नातेवाईकांने व्यक्त केला.

## मन आणि आत्मा शरिराला बरे करतो...

Healing body, Mind & Spirit याचाच अर्थ मन आणि आत्मा शरिराला बरे करतो असा होईल. हॉस्पीटल प्रशासनाने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांचे मन आणि आत्मा शांत राहील या पद्धतीने ट्रीट करणे गरजेचे असते. पैसे भरल्याशिवाय इंजेक्शन जर रुग्णाला मिळणार नसेल तर खरच या लोगोमधील स्लोगनचा काही अर्थ आहे का? जे मन व आत्मा शांत राहिला पाहिजे तोच येथे विचलीत होतो आहे.




# संतोष देशमुख हत्या प्रकरणात राजकीय अजेंडा चालवला जातोय

## मराठा आंदोलक मनोज जरांगे यांचा अंतरवालीत गंभीर आरोप

**जालना । प्रतिनिधी** - मस्साजोगच्या संतोष देशमुख हत्या प्रकरणात राजकीय अजेंडा चालवला जात असल्याचा गंभीर आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी केला आहे.. आरोपींची नावं सांगणारे तेच आहेत. सहआरोपी करा म्हणणारे तेच आहेत. आणि सरकारमध्येही तेच आहेत. मग कारवाई का होत नाही. असा सवाल मनोज जरांगे यांनी सोमवार (दि२४) रोजी पाच वाजेच्या सुमारास उपस्थित करत नाव न घेता सुरेश धसांचा समाचार घेतलाय. न्यायासाठी कुटुंबाला आंदोलन करावं लागतंय हे दुर्दैवं आहे. समाजाचा दबाव ही एक ताकद असते. मात्र आता तिथे राजकीय शंका येत आहे. त्यांनी लढा हातात घेतलाय. तर चालू द्या. सुरेश धसांचा विषय माझ्यासाठी संपलेला आहे. कारण आता यातला एकही आरोपी सुटला तर याला जबाबदार हे सरकार आणि मध्यस्थी करणारे असतील असंही जरांगे यांनी म्हंटलं. दरम्यान राज्यात दोन चार आंदोलनं अजून उभे राहणार आहेत. फडणवीसांना मला एकटं पाडायचा प्रयत्न आहे. मी मॅनेज होत नाही आणि फुटत नाही ही माझी चूक आहे का? ही दुसरी वळवळ चांगली नाही. मी माझ्या बांधवांना दोषनाही. मात्र मराठेच मराठ्यांच्या अंगावर घालणं हे बरोबर नाही.



फडणवीसांनी ठरवलं असेल मराठ्यांची शक्ती मराठ्यांविरोधात वापरायची. मात्र मी गद्दारांच्या यादीत जाणार नाही मरण पण शरण जाणार नाही असं म्हणत जरांगे यांनी फडणवीसांवर टीका केली.

# मोफत वीज योजनेतील ग्राहकांना वीज बील आकारण्याचा प्रस्ताव

## पीएम सूर्य घर योजनेला बसणार बिलाचा शॉक?

**जालना । प्रतिनिधी** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महत्वाकांशी प्रकल्प ३०० युनिटपर्यंत वीज वापरणार्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी तसेच अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे या उद्देशाने सुरू केलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतील ग्राहकांनाही वीजबिल आकारण्याचा प्रस्ताव आहे. त्यात ग्राहकांना संध्याकाळी सहा ते सकाळी नऊ यावेळेत वापरलेल्या विजेवर बिल आकारावे, असे महावितरणने वीज विद्यामक आयोगाकडे दिलेल्या प्रस्तावात म्हटले आहे. प्रस्ताव मंजुर झाल्यास जिल्ह्यात सौरधर योजनेच्या लाभार्थ्यांना मात्र मोठा शॉक बसणार आहे.

या योजनेला जिल्ह्यात मोठा प्रतिसाद मिळालेला आहे. सौर घर योजनेतील ग्राहक अतिरिक्त वीज महावितरणला पाठवून उत्पन्नही मिळवीत आहे. पॅनल्स बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून तीन किलोवॅटला ७८ हजार



रुपयांपर्यंत अनुदान मिळत आहे. असे असताना दिलेला हा प्रस्ताव मंजूर झाल्यास कर्ज काढून घरावर सौरऊर्जा पान २ वर

# नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व श्रीमती जेबीके विद्यालयाच्या तेजसची चमकदार कामगिरी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी** - शहरातील नवभारत शिक्षण संस्थेच्या नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व श्रीमती.जे.बी. के. विद्यालयाचा विद्यार्थी तेजस सोनाळकर याने रोलर रिले स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया, ऑर्गनायझेशन रोलर रिले स्केटिंग महाराष्ट्र असोसिएशन महाराष्ट्र, स्केटिंग चषक गोवा, यांच्या संयुक्त विद्यमाने २३फेब्रु.२०२५रोजी गोवा राज्यात पार पडलेल्या राज्य स्तरीय स्केटिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला असुन महाराष्ट्राचा विजयी झेंडा फडकावला आहे. तेजस सोनाळकर हा श्रीमती.जे.बी. के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयातील अष्टपैलू खेळाडू म्हणून नावलौकिकास आला असून सततचा सराव, आई वडील व कुटुंबाची भक्कम साथ,व विद्यालयातील क्रीडा शिक्षक. राजेश शेवाळे व कैलास भूतेकर यांचे योग्य मार्गदर्शन या जोरावर तेजस सोनाळकर याने रोलर रिले स्केटिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावुन आपल्या विद्यालयाचा व कुटुंबाचा नावलौकिक वाढवला आहे. या अगोदर ही राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धेत तेजस ने अशीच यशस्वी कामगिरी केली होती, या अष्टपैलू खेळाडूचे,, व त्यास मार्गदर्शन करणारे कैलास भुतेकर राजेश शेवाळेयांचे संस्थेचे अध्यक्ष. संजय काबरा,उपाध्यक्ष. शेख जमीर शेख अमीर सर, सचिव. सत्यनारायण सोनी, कोषाध्यक्ष. सुभाष राठी, ज्येष्ठ संचालक रामनारायण काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी अध्यक्ष सुरेश शेठ काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी सचिव प्रेमसुख काबरा, संचालक तथा माझी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक. मधुकर निकम सर,संचालक विष्णू सांगुळे, संचालक तथा उप प्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर संचालक प्रदीप काबरा, प्रदीप मुळे म, प्राचार्य. नंदकुमार काळे, उपमुख्याध्यापक. पंजाबराव सोळंके, पर्यवेक्षक. धनंजय पुराणे, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक अरुण आहेर, प्राध्यापक रामदास भांगे, प्राध्यापक कैलास जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉ. आनंद जाधव, पान २ वर



# लघुप्रकल्पातील ३३ टक्के पाणीसाठ्याच नियोजन न करणाऱ्या अधिकाऱ्यांची हकालपट्टी करा

## सुरेश काळे यांची मागणी, अन्यथा दिला आंदोलनाचा ईशारा

**जालना । प्रतिनिधी** - लघुप्रकल्पातील ३३ टक्के पाणीसाठ्याच नियोजन न करणाऱ्या अधिकाऱ्यांची हकालपट्टी करा अन्यथा तीव्र आंदोलन करू असा ईशारा सोमवार (दि २४) रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास लघु पाटबंधारे कार्यालया परिसरात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश काळे यांनी केली आहे जर या बेजबाबदार अधिकाऱ्याची हकालपट्टी केली नाही तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीन तीव्र आंदोलन केले जाईल असा ईशारा देखील जिल्हाध्यक्ष सुरेश काळे यांनी दिला आहे.यंदा तीव्र पाणीटंचाई ग्रामीण भागात जाणवत असून गेल्यावर्षी देखील ग्रामीण भागातील पाण्याचं नियोजन करण्यात आलं नव्हतं. प्रशासनाने केवळ कागदी घोडे नाचवले होते. मात्र आता यावर्षी ग्रामीण भागात पाणीटंचाई जाणवत असून पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे अशा परिस्थितीत पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित देशमुख हे बेजबाबदारपणे वागत असून त्यांनी अद्यापपर्यंत कोणतेही पाण्याचे नियोजन केलेले नाही त्यामुळे त्यांची हकालपट्टी करावी अशी मागणी सुरेश काळे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

जालन्याला आतापासूनच पाणीटंचाईला सामोरे जावं लागतंय जणू दुष्काळ जालनेकराच्या पाचवी पूजलेला. मागच्या वर्षी दुष्काळाचे चटके सहन करावं लागले होते जालणेकर विसरले नाहीये. जालना जिल्ह्यात एकूण ६४ प्रकल्प असून त्यात ७ मध्यम तर ५७ लघु प्रकल्प आहे. ७ मध्यम प्रकल्पात ४१.७४ टक्के तर ५७ लघु प्रकल्पात ३३.६२ सरासरी टक्केवारी जलसाठा आहे. या प्रकल्पाचे काटेकोरपणे नियोजन करणे गरजेचे असताना लघु पाठबंधारे विभाग याकडे सोयीस्कररित्या दुर्लक्ष करतांना दिसत आहे. या विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित देशमुख कोणत्याही प्रकल्पाला भेटी देणं तर सोडा साधा आढावा घेणे दूरच. शेतकऱ्यांना वेळ देत नाहीये टाळाटाळीची उत्तरं देतायेत. कार्यकारी अभियंतानी आपल्या कामात सुधारणा करणे गरजेचे होय. अश्या बेजवाबदारी कार्यकारी अभियंताची हक्कालपट्टी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आलीय. नसता स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने निर्णयक आंदोलन करण्याचा ईशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेशभाऊ काळे यांनी दिला.



# संपादकीय

## दिल्लीत पुन्हा महिला राज

अरविंद केजरीवाल यांच्या आप पक्षाचा दणदणीत पराभव करून भाजपने तब्बल सत्तावीस वर्षानंतर दिल्लीत सत्ता स्थापन केली. दिल्लीत अभूतपूर्व विजय मिळवताच सर्वांना एकच प्रश्न पडला तो म्हणजे दिल्लीचे नवे मुख्यमंत्री कोण ? या प्रश्नांचे उत्तर मिळण्यास काही जवळपास तेरा दिवसांचा कालावधी लागला कारण या कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर होते. पंतप्रधान फ्रान्स आणि अमेरिकेचा दौरा आटोपून आल्यावर भाजपने दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्यांची घोषणा केली. दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्यांची घोषणा करताना भाजप श्रेष्ठींनी पुन्हा एकदा धक्का तंत्राचा अवलंब करून सर्वांना अचंबित केले. भाजपने मध्यप्रदेश आणि राजस्थानमध्ये धक्कातंत्र राबवून अनपेक्षित असे नवे चेहरे समोर आणून त्यांना खुर्चीवर बसवले त्याच धक्कातंत्राचा वापर करत भाजप श्रेष्ठींनी दिल्लीतही अनपेक्षित नवीन चेहरा समोर आणून त्यांना मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसवले. तो नवा चेहरा म्हणजे दिल्लीच्या विद्यमान मुख्यमंत्री रेखा गुप्ता. वास्तविक निवडणुकीच्या आधी आणि नंतर ही रेखा गुप्ता या मुख्यमंत्र्यांच्या शर्यतीत नव्हत्या. त्या मुख्यमंत्री बनतील असा अंदाज कोणालाच आला नव्हता. कारण मागील दोन विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. भाजप प्रवेश वर्मा यांना मुख्यमंत्री बनवतील असा कयास होता कारण प्रवेश वर्मा हे दिल्लीचे माजी मुख्यमंत्री दिवंगत साहबसिंग वर्मा चिरंजीव. ते माजी खासदार असून दिल्लीतील प्रभावशाली नेते आहेत शिवाय त्यांनी अरविंद केजरीवाल यांचा पराभव केल्याने ते जायंट किलर ठरेलत. ते ज्या जाट समाजाचे आहेत त्यांची संख्या दिल्लीत लक्षणीय आहे मात्र भाजप श्रेष्ठींच्या त्यातही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मनात रेखा गुप्ता यांचे नाव होते. रेखा गुप्ता यांना दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसवण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मोठा वाटा आहे. संघाची पहिली पसंती रेखा गुप्ता याच होत्या कारण रेखा गुप्ता या विद्यार्थी दशेपासून संघ परिवाराशी जुळलेल्या आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. संघाने त्यांच्यावर ज्या जबाबदाऱ्या दिल्या त्या त्यांनी जबाबदारीने पार पाडल्या. दुसरी महत्वाची गोष्ट त्या महिला आहेत. दिल्लीत मागील काही वर्षात काँग्रेस व आपने महिलांना मुख्यमंत्रीपदाची संधी दिली. काँग्रेसच्या शिला दीक्षित या जवळपास पंधरा वर्ष दिल्लीच्या मुख्यमंत्री होत्या. आपनेही केजरीवाल तुरुंगात गेल्यावर आतिशी या महीलेकडेच मुख्यमंत्रीपदाची सूत्रे सोपवली. इतकेच नाही तर भाजपनेही दिल्लीत सुषमा स्वराज यांच्याकडेच मुख्यमंत्रीपदाची धुरा सोपवली होती. त्यामुळे भाजपने तीच परंपरा राखत रेखा गुप्ता यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ घातली. रेखा गुप्ता या वैश्य समाजाच्या आहेत. केजरीवाल हेही वैश्य समाजाचे आहेत. मागील पंधरा वर्षापासून दिल्लीतील वैश्य समाज केजरीवालांच्या पाठीशी उभा होता. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करून भाजपने केजरीवालांकडे गेलेला वैश्य समाज पुन्हा आपल्याकडे वळवला आहे. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करण्यामागे आणखी एक कारण आहे. भाजप हा आज देशातील सर्वात मोठा पक्ष आहे. देशातील १३ राज्यात आणि एका केंद्रशासित प्रदेशात भाजपची सत्ता आहे मात्र कोठेही भाजपने महिलेला मुख्यमंत्री पदाची संधी दिली नाही. वसुंधरा राजे या भाजपच्या शेवटच्या महिला मुख्यमंत्री होत्या. २०१३ ते २०१८ या कालावधीत त्या राजस्थानच्या मुख्यमंत्री होत्या. २०१८ नंतर अनेक राज्यात भाजपची सत्ता आली मात्र कोणत्याही राज्यात भाजपने महिलेला मुख्यमंत्री बनवले नाही त्यामुळे भाजपवर विरोधी पक्षांकडून टीका होत होती. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करून भाजपने ती टीका खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. नाही म्हणायला याआधी भाजपने चार महिलांना मुख्यमंत्री पदाची संधी दिली आहे. स्वर्गीय सुषमा स्वराज यांना दिल्ली, उमा भारती यांना मध्यप्रदेश, वसुंधरा राजे यांना राजस्थान तर आनंदीबेन पटेल यांना गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी बसवले होते. आता रेखा गुप्ता या भाजपच्या पाचव्या मुख्यमंत्री बनल्या आहेत. रेखा गुप्ता यांना मुख्यमंत्री करून भाजपने एकप्रकारे दिल्लीत महिला राज आणले आहे. आता रेखा गुप्ता यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. निवडणूक काळात भाजपने दिल्लीकरांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यापुढे आहे. भाजपने दिल्लीत महिलांना प्रतीमाह ३५०० रुपये रोख देण्याचे आश्वासन दिले आहे. या आश्वासनाला भुलून दिल्लीतील महिलांनी भाजपला भरभरून मते दिली आहेत. आता महिलांना प्रतिमाह ३५०० रुपये देतानाच दिल्लीची तिजोरी रिकामी होणार नाही याचीही काळजी त्यांना घ्यावी लागेल कारण तिजोरी रिकामी झाली तर त्याचा परिणाम विकास कामांवर होतो त्यामुळे दिल्लीकरांना दिलेली आश्वासने पूर्ण करीत विकास कामे करण्याची तारेवरची कसरत त्यांना करावी लागणार आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# वाळूखाली दबून मृत्युमुखी पडलेल्या बांधकाम कामगारांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** लाल बावटा बांधकाम कामगार संघटना सलग्न सिटू जालना च्या वतीने मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना पासोडी ता. जाफराबाद येथील पाच बांधकाम कामगार वाळूच्या ढिगाऱ्याखाली दबून मृत्युमुखी पडले त्यासंदर्भात निवेदन इ मेल द्वारे पाठवण्यात आले.त्या निवेदनात म्हटले की, जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील पासोडी गावामध्ये दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी पहाटे ०३:३० वा. वाळूचे टिप्पर झोपलेल्या कामगारावर खाली केल्यामुळे वाळू खाली दबून पाच बांधकाम कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

जालना जिल्ह्यात अवैधरित्या वाळूची वाहतूक मोठ्या प्रमाणात चालते. बांधकाम ठेकेदार व वाळूचे ठेकेदार राजरोसपणे रात्री वाळूची तस्करी करतात. जाफराबाद तालुक्यात पासोडी या गावात फुलाचे काम चालू आहे. त्या कामावरील मजूर दिवसभर श्रम करून रात्री झोप घेत असतात. टिप्पर मालक गोपाळ गवळी व टिप्पर चालक संतोष कोल्हे यांनी वाळू चोरून आणून पहाटे साडेतीन वाजेच्या सुमारास जिथे बांधकाम मजूर झोपले होते त्या ठिकाणी वाळूचे टिप्पर घाई गर्दीने खाली केले त्यामुळे वाळूच्या डिगऱ्या खाली दबवून पाच बांधकाम कामगारांचा मृत्यू झाला.

अश्या दुर्घटना शासनाच्या नाकर्तेपणामुळे घडत असे अनेक ठिकाणी स्पष्ट झाले आहे. शासन वेळेवर वाळूचे लिलाव करत नाही. वाळूची तस्करी रोखत नाही. त्यामुळे रात्री वाळूचा उपसा होणे अवैधरित्या वाहतूक होणे अशा प्रकारामुळे ही घटना घडली आहे. तसेच बांधकाम कामगारांचे ठेकेदार राहण्याची व्यवस्था करत नाही. त्यांना उघड्या ठिकाणी झोपावे लागते. या मजूर बांधकाम कामगारांची बांधकाम कल्याणकारी मंडळात नोंदणी देखील केली आहे की नाही हा प्रश्नच आहे. म्हणून खालील मागण्या करण्यात आल्या.१)मृत्युमुखी पडलेल्या कामगाराच्या कुटुंबांना प्रत्येकी २५ लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी.२) वाळू टिप्पर मालकावर व चालकावर आणि सदर कामाच्या ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. ३) मृत झालेल्या बांधकाम कामगारांच्या कुटुंबांना बाधकाम कल्याणकारी मंडळाच्या नियमानुसार वेगवेगळ्या सुविधा द्या. ४) जिल्ह्यात ज्या ठिकाणी शासकीय कामे चालू आहेत. त्या ठिकाणी नोंदणीत कामगारांनाच कामावर घ्यावे. किंवा जे कामगार नोंदणीत नसतील त्यांची नोंद कल्याणकारी मंडळात करून घ्यावी. निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष ज्येष्ठ कामगार नेते अण्णा सावंत जन सेक्रेटरी ॲड अनिल मिसाळ यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्हा परिषद मुगाव शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात




**पुणे । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद मुगाव येथील शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी विद्यार्थ्यांकडून विविध कलाविष्कार सादर करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गणेश वंदना, लहान मुलांचे काल्पनिक विश्व ,शेतकरी गीत, जागरण गोंधळ ,बॉलीवूड, सोशल मीडिया या गाण्यांवर नृत्य व माझी शाळा हे नाटक अशा विविध विषयांवर कलागुण सादर करून उपस्थितांची मने जिंकली तर भगतसिंग यांच्या जीवनपटावरील माहितीपट विद्यार्थ्यांनी सादर केला तो या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. यावेळी राज्य विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य संभाजी यादव , देऊळगाव राजे केंद्राच्या केंद्रप्रमुख वैशाली जानराव , हिंगणी बेर्डी गावच्या पोलीस पाटील राधिकाताई पाहणे, विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन सुवर्णाताई कामठे व हनुमंत कामठे तसेच सामाजिक कार्यकर्ते भगवान खोमणे व ग्रामपंचायत सदस्य विकास ढवळे , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष महेश बागल आदी मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित पालक, ग्रामस्थ व शिक्षण प्रेमी नागरिक यांनी सांस्कृतिक कार्यक्रमास भरभरून प्रतिसाद दिला व बक्षिसांचा वर्षाव केला. यावेळी देऊळगाव राजे केंद्राच्या केंद्रप्रमुख वैशाली जानराव यांनी मार्गदर्शन केले व राज्य कर आयुक्त महाराष्ट्र राज्य संभाजी यादव यांनी आपले मनोगत व्यक्त केले व शाळेविषयी गौरवोदगार काढले. याप्रसंगी तालुक्यातील शिक्षक व मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती , सर्व पालक तसेच मुख्याध्यापक दत्तात्रय शिंदे व उपशिक्षिका रूपाली शिंदे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक दत्तात्रय शिंदे सर व रामचंद्र जगताप यांनी केले.

# शहरातील एका चित्रपटगृहाची केली तोडफोड

### कदिम जालना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल




**जालना । प्रतिनिधी -** विनातिकीट छावा चित्रपट पाहण्यासाठी मद्यधुंद तरुणांनी राडा केल्याच समोर आलंय. जालना शहरातील एका चित्रपट गृहात ६ ते ७ मद्यधुंद तरुण छावा चित्रपट पाहण्यासाठी गेले होते. यावेळी या मद्यधुंद तरुणांनी विनातिकीट चित्रपट पाहू द्या अशी मागणी केली. मात्र, त्यांना विनातिकीट चित्रपट पाहण्यास मज्जाव केल्याने या अज्ञात मद्यधुंद तरुणांनी चित्रपट गृहाची तोडफोड केलीय. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. जालना शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील निलम टॉकीज जवळ अज्ञातांनी रात्री ११.३० वाजेच्या सुमारास ७ ते आठ जनांनी धुडघूस घालून तोडफोड करीत तुफान राडा केल्याची घटना घडली. छावा चित्रपट मोफत न पाहु दिल्याने हा राडा केल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आलीय. या प्रकरणी राहुल मांगधरे यांच्यासह ६ ते ७ जनावर रात्री गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलीस सुत्रांनी दिली. सध्या छावा चित्रपट सुरु असून त्यात विना टिकीट प्रवेश करुन चित्रपट पाहु दिला नसल्याचा राग आल्याने राहुल मांगदरे आणि इतर ६ ते ७ जनांना टॉकीजच्या काचा व इतर साहित्याची तोडफोड करुन राडा केला. त्यानंतर टॉकीजचे व्यवस्थापक उमेश भुरेवाल यांनाही मारहाण केली. हा सर्व प्रकार सीसीटीव्हीमध्येही कैद झालाय. या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात उमेश भुरेवाल यांच्या फिर्यादीवरुन रात्री उशीराने गुन्हा दाखल करण्यात आलाय. पोलीसांनी घटनास्थळी भेट दिली असून परिस्थिती नियंत्रणात आहे. या प्रकरणाचा तपासण पोलीस उप निरीक्षक ज्ञानदेव नांगरे हे करीत आहेत.

# पुर्णा नदीपात्रातून भरदिवसा वाळू उत्खनन!

**मंठा । प्रतिनिधी -** पुर्णा नदीकाठच्या उस्वद- देवठाणा- कानडी- लिंबखेडा व टाकळखोपा- किर्ला- वाघाळा- केधळी पोखरी या गांवच्या हद्दीतून स्थानिक वाळूचोरांकडुन रात्रंदिवस थेट नदीपात्रातुन एकाचवेळी तीन-चार जेसीबीच्या साह्याने वाळू उत्खनन करून तब्बल वीस ते पंचवीस ट्रॅक्टर व टिप्पर भरुन वाहतूक करुन गांवच्या सार्वजनिक जागेवर किंवा ५ ते १० मिनीटाचा अंतरावर हिंगोली , बुलढाणा व वाशीम जिल्ह्याचा हद्दीजवळ अवैध वाळू साठे करुन विक्रीचा गोरखधंदा बिनबोभाट सुरू आहे. जालना जिल्हा प्रशासनाकडून अद्यापही एकाही वाळू पट्टाचे लिलाव झालेले नसताना 'रात्रीचा खेळ' नेमका कोणत्या आकाच्या आशीर्वादाने सुरू आहे. वाळू चोरीमुळे पुर्णा नदीकाठच्या वाळू चोरांना सुगीचे दिवस आले असल्याची चर्चा पंचक्रोशीत ऐकायला येत आहे.

**देवठाणा- बन हद्द बनली वाळू विक्री अड्डा**

पुर्णा नदीपात्रातून वाळू उत्खनन करून अवघ्या १० मिनिटांच्या अंतरावरील हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील बन- देवठाणा गांवच्या हद्दीत वाळू साठे करुन विक्रीचा व्यवसाय राजरोसपणे सुरू आहे. याठिकाणावरुन बन -कापडसिगी मार्गे सेनगाव , इंचा- शिरपूर - कोकरबा



मार्गे लोणार तर बन- रायगाव- लोणी मार्गे रिसोड तालुक्यातील बांधकामांना वाळू पुरविली जाते.

ऑक्टोंबर महिन्यांपासून नदीपात्र हळूहळू कोरडे पडत आहे . त्यानंतर आजपर्यंत तब्बल ५ महिन्यात अंदाजे १० हजार ब्रास वाळू चोरीतुन महसूल बुडाला. त्यास कोण जबाबदार आहे ? या अवैध वाळू उत्खनन व वाहतूकीला अभय कुणाचे ? एकीकडे सर्व सामान्यांचा प्रश्नांसाठी फोन न घेणारे अन् पुर्णा नदीकाठच्या वाळू चोरासोबत हातमिळवणीतुन कोटींची संपत्ती कमाई करणाऱ्या महसूल व पोलीस प्रशासनातील अधिकारी- कर्मचाऱ्यांचे सीडीआर तपासणी व्हावी , महसूल व पोलीसांच्या हप्ते खाऊ धोरणच कारणीभूत असल्याचा आरोप उस्वदचे माजी सभापती सुरेश सरोदे यांनी पत्रकारांशी बोलताना केला.

तळणीकडून लोणारकडे सकाळी ६ वा. अवैध वाळू वाहतूक करणारे दोन टिप्पर दिसताच शिरपूर फाट्यावर दबा धरून बसलेले प्रशिक्षणार्थी उपजिल्हाधिकारी अरुण एम यांनी पाठलाग करून गणपती मंदिर परिसरात पकडले. कारवाईदरम्यान हद्दीवरून विदर्भातील वाळू चोरांनी मज्जाव केला होता. मात्र , त्यानंतर मंठा व लोणार महसूल व पोलीसांची मद्दत घेत दोन्ही टिप्पर ताब्यात घेतले. कारवाई तील नायब तहसीलदार कल्याण काळदाते व तळणी मंडळ अधिकारी अनिल उफाड यांना संपर्क साधला असता , काळदाते नाही फोन घेतला नाही तर उफाड यांचा मोबाईल स्विच ऑफ आढळून आला.

## पान १ वरुन

### नवभारत कनिष्ठ ...

एस.बी. बोरकर सर, जेष्ठ शिक्षक.गणेश सावसक्के, रमेश इंगळे, विष्णू जाधव, संजय कुलकर्णी, समाधान कांबळे, वासुदेव क्षीरसागर, रवींद्र मोरे, जगताप सर, माधुरी पाटील, मंजुषा भिलावेकर, दत्ता उखर्डे,ज्योतीताई जाधव, राजुभाऊ डोमळे, नागोराव देशमुख, दगडुबा तांबेकर, दिपक देशमुख, आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### मोफत वीज ...

निर्मिती पॅनल्स बसविलेल्यांना बँकेचा हप्ता आणि वीजबिल भरण्याचा दुहेरी झटका ग्राहकांना बसणार आहे. मोठ्या ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत वीज वापरताना प्रति युनिट २.१५ पैसे सुट मिळेल परंतु उर्वरित १६ तासांच्या वीज वापरासाठी प्रति युनिट ०.९० ते १.६५ रुपये अतिरिक्त रॅगिंग द्यावे लागेल. पूर्वीच्या रचनेनुसार ८ तासांसाठी प्रति युनिट १.५० रुपये सवलत आणि ३ तासांसाठी ०.८० रुपये अतिरिक्त अधिभार आणि ४ तासांसाठी १.१० रुपये अतिरिक्त अधिभार होता. परिणामी, ग्राहकांसाठी एकूण बिल वाढणार आहे.

सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंतचा हा कालावधी सौरऊर्जा निर्मितीसाठी योग्य असल्याने मोठ्या वापरकर्त्यांना फक्त ८ तासांसाठी सौरऊर्जेचा लाभ मिळेल. पूर्वी तो २० तासांसाठी होता. ज्यामध्ये जवळच्या तासांचाही समावेश होता. सदरील नवीन प्रस्ताव मंजूर करण्यात आला तर बँकिंग आणि नेट मीटरिंगची संकल्पना रद्द केली जाईल. कारण इतर वेळ क्षेत्रांमध्ये निर्माण होणारी अतिरिक्त वीज भरपाई करता येत नाही. भारत २०७० पर्यंत शून्यावर पोहोचण्याचा आणि २०३० पर्यंत ५०० गिगावॅट आरई वीज मिळविण्याचा विचार करत आहे. जर ही विनंती एमईआरसीने मंजूर केली तर कधीही हे लक्ष्य गाठू शकणार नाही. कारण सर्व प्रकल्पांचे आकार कमी होतील. सौरऊर्जा प्रकल्प असलेल्या ग्राहकांसाठी सुधारित टेलिस्कोपिक बिलिंग सुचवले आहे. ते ग्राहकांच्या वापरात उत्पादनाचा हिशेब देऊ इच्छितात. उत्पादन परवानाकृत आहे आणि वितरण कंपनीचा उत्पादनावर कोणताही अधिकार नसल्याचे दाखविले आहे.

महावितरणने सूर्य धर योजनेतील ग्राहकांना बिलाची आकारणी केली तर मूळ उद्देशाला धक्का लागणार आहे. बिल भरायचे असेल तर कर्ज काढून सौरऊर्जा पॅनल्स का बसवायचे, असा प्रश्न ग्राहकांना पडत आहे. ग्राहकांनी पाठ फिरवली तर सौरऊर्जे संबंधीच्या उद्योगांना जबर फटका बसणार आहे.

## वाचकांचे मनोगत

### गगनचुंबी इमारतींच्या पायाभूत सुविधांवर कोणाचे लक्ष!

महानगरातील राहत्या जागाची वाढती मागणी असल्यामुळेच जागांचे भाव गगनाला भिडले.घर घेणे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहे म्हणूनच लोक उपनगरात गेले.बैठ्या चाळी होत्या ,झोपडपट्ट्या होत्या त्या जागा विकासाचा केंद्र बिंदू ठरल्या.अशा ठिकाणी राहणाऱ्यांना मोफत घर देण्याची पद्धत रुढ झाली.कमी क्षेत्रफळ असलेल्या ठिकाणी मोठ मोठ्या इमारती उभ्या होत गेल्या.चेंबूर येथील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांच्या इमारतींना ८४ मीटर उंचीची परवानगी देण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने विमान प्राधिकरणाला दिले आहेत. मुंबईत सर्वाधिक उंचीच्या इमारती आहेत. ३० मजल्या पर्यंत आग विझवण्याची क्षमता मुंबई अग्निशमन दलातील स्नॉर्केल ९० मीटर पर्यंत पोहचते.उच्च इमारती उभ्या करताना पायाभूत सुविधांवर लक्ष देणे आवश्यक आहे.पिण्याच्या पाण्याच्या वाहिन्या ,अग्निशमन यंत्रणा,मल:निस्सारण वाहिन्या,सांडपाणी वाहिन्या, गॅस वाहिन्या यांची व्यवस्था उत्तम दर्जाची असावी.मोठ्या गगनचुंबी इमारतीत किमान दोनशे सदनिका असल्यास त्यांना रस्त्याची सोय,वाहनतळ, पिण्याच्या पाण्याची साठवण टाकी,घन कचरा निर्मूलन, साफसफाई याकडे लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे.शिवाय तेथील विभागाची लोकसंख्या वाढते.पर्यायाने महानगरपालिकांवर सेवा सुविधा देण्याचा भार येतो.महानगरपालिका सक्षम असतील तर त्यांची विविध सेवा देणारी खाती सक्षम असतील तेव्हा गगनचुंबी इमारतीतील नागरिकांना पायाभूत सेवा देतील एकुणच शासकीय यंत्रणेतील तत्परता असणे लोकांच्या हिताचे ठरेल.

**महादेव गोळवसकर,**
**कुर्ला मुंबई**
९८६९४७६२०९, mahadeogolvaskargmail.com

प्रकृतीची शुद्धता व मानवतेच्या उत्थानाच्या दिशेने निरंकारी मिशनचे एक स्वर्णिम पाऊल

# परिक्षेत्रामध्ये राबविले 'स्वच्छ जल - स्वच्छ मन' अभियान


**जालना । प्रतिनिधी -** परम वंदनीय सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व सत्कार योग्य आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन आशीर्वादाने २३ फेब्रुवारी २०२५ ची स्वर्णिम प्रभात एक नवीन जागृती व सेवेच्या दिव्य प्रकाशाचा संदेश घेऊन आली ज्यामध्ये 'अमृत प्रोजेक्ट' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' अभियानाच्या तिसऱ्या टप्प्याचे आयोजन विश्वभरात केले गेले आणि त्याबरोबरच निरंकारी मिशनच्या विशाल सत्संग कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या अभियाना अंतर्गत जालना परिक्षेत्रातील संभाजी उद्यान (मोती बाग) या ठिकाणी जलस्रोतांची स्वच्छता करण्यात आली. ज्यामध्ये माजी राज्यमंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर, महानगर पालिकेच्या उपायुक्त प्रियंका राजपूत, राजेश राऊत, संध्याताई देठे, उदय शिंदे, जालना जिल्हा संयोजक राजकुमार पारसवाणी व किरण गरड, अनिल गुलडा आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना आमदार खोतकर म्हणाले की, संत निरंकारी मंडळाचे कार्य कौतूकास्पद आहे, असे ते म्हणाले.

संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने, पूज्य बाबा हरदेवसिंहजी यांच्या असंख्य दिव्य शिकवणूकींतून प्रेरणा घेत या पावन अभियानाचे आयोजन करण्यात आले. पूर्वीप्रमाणेच याही वर्षी 'चला सावरु, यमुना किनारे' असा उद्घोष करत या अभियानाला आणखी व्यापक स्वरूप देण्यात आले.

२७ राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील १६५० पेक्षा अधिक ठिकाणी १० लाखांहून अधिक संख्येने सेवाभावनेने ओतप्रोत स्वयंसेवक भक्तगणांनी एकाच वेळी हे महान अभियान साकारले. हे दृश्य केवळ प्राकृतिक स्वच्छतेपर्यंत सीमित न राहता, अंतर्मनाला निर्मळ आणि पवित्र करण्यार्या एका आध्यात्मिक यात्रेचे सुंदर प्रतीक बनले. प्रत्येक श्रद्धाळु भक्ताची समर्पित उपस्थिती या गोष्टीचे प्रमाण होते, की जेव्हा प्रेम, सेवा आणि समरसतेचा दिव्य संगम होतो तेव्हा प्रकृतीही नवजीवनाचा अनुभव घेते.

सतगुरु माताजींनी पाण्याच्या महत्व अधोरेखित करताना समजावले, की पाणी अमृतासमान आहे जे प्रकृतीने आपल्याला सर्वोत्तम उपहाराच्या रुपात प्रदान केले आहे. त्याची स्वच्छता आणि संरक्षण ही केवळ एक जबाबदारीच नव्हे तर आमची स्वाभाविक सवय बनून गेली पाहिजे. बर्याचदा आपण अजाणतेपणे आपण वापरा व फेकून द्या अशा वस्तू व घाण जलस्रोतांमध्ये टाकून प्रदूषणात भर घालत असतो ज्यामुळे पर्यावरणाची हानी होते. याच चिंतनातून प्रेरित होऊन



'प्रोजेक्ट अमृत' सारख्या सामाजिक उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे जी जल संरक्षण आणि स्वच्छतेच्या प्रति जागरुकता पसरविण्याचा एक महत्वपूर्ण प्रयास आहे.

बाबा हरदेवसिंहजी यांच्या जन्मदिवसाला समर्पित असलेल्या या पवित्र सेवा अभियानात प्रत्येक भक्ताला जल संरक्षणाच्या दिशेने योगदान देण्याची संधी मिळाली. हा पुढाकार केवळ घाट आणि जलस्रोतांच्या स्वच्छतेवर केंद्रीत नसून घरांमध्येही लहान-सहान सवयींतून जल बचतीला प्रोत्साहित करत आहे ज्यायोगे पाण्याचा आदर व्हावा आणि हे अमूल्य संसाधन भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित राहू शकेल.

पर्यावरण सुरक्षें अंतर्गत जल संरक्षणामध्ये आपली सकारात्मक सक्रिय भूमिका निभावत ग्लोबल एनर्जी न्ड एन्व्हायरनमेंट फाउंडेशनने संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनला प्रतिष्ठित 'वाटर कंजर्वेशन इनिशिएटिव एनजीओ ऑफ द ईयर २०२५' पुरस्कार देऊन गौरविले आहे. हा गौरवपूर्ण सन्मान प्रोजेक्ट अमृत - स्वच्छ जल, स्वच्छ मन आणि त्यातील विविध जल संरक्षण व स्वच्छतेसाठी घेतलेल्या पुढाकाराच्या प्रति अथक समर्पणाचे प्रतीक आहे. नि:संशय जल संसाधनांची शुद्धता आणि सतत संरक्षण करण्यामध्ये केले जाणारे प्रयास समाजाला स्वच्छ, स्वस्थ आणि समृद्ध भविष्याकडे अग्रेसर होण्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका निभावत आहेत.

निरंकारी सेवादल स्वयंसेवक व भाविक भक्तगणांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला.

# राष्ट्रसंत गाडगे महाराज यांना सम्यक परिवाराचे अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त उत्तरानगरीयेथील सम्यक परिवाराकडून गाडगे महाराज यांना विनम्र अभिवादन करण्यात आले . या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रविंद्र मस्के उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष मारोती नरवडे होते.

प्रमुख पाहुणे रविंद्र मस्के सर यांनी गाडगे महाराज यांचे विचार येणाऱ्या पिढीला आणि समाजाला खूप मार्गदर्शक ठरतील असे सांगितले . पुढे ते म्हणाले की संत गाडगे महाराज एक थोर समाजसुधारक , विज्ञानवादी आणि मानवतावादाचे कर्ते सुधारक होते . गाडगे महाराज यांनी जिवनभर समाजसेवा केली व समाजासाठी आपले संपूर्ण जिवन आर्पण केले होते, असे त्यांनी नमूद केले. अध्यक्ष मारोती नरवडे सर यांनी सुद्धा संत गाडगे महाराज यांच्या जिवनावर सखोल विचार मंडले. त्यांनी आपले विचार मंडतांना संत गाडगे महाराज हे स्वच्छतेचे अग्रदूत होते . गाडगे बाबांनी महाराष्ट्रालाच नव्हेतर देशाला स्वच्छतेचे महत्व पटवून दिले आहे . संत गाडगे महाराजांनी आपल्या मार्मिक विचारतून समाज प्रबोधन केले व गावा गावात जाऊन समाज जाग्रतीचे मोलाचे कार्य केले असे आवर्जून सांगीतले.

प्रास्ताविक प्रा.जयंत आणि आभार कोमल पाखरे यांनी केले. या कार्यक्रमास सम्यक परिवारातील महिला, तरूण व मुले यांची उपस्थिती होती.

# बोरगाव मठ येथे अखंड हरिनाम सप्ताह

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील बोरगाव मठ येथे महाशिवरात्रीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिवेश्वर संस्थान बोरगाव मठ येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



अखंड हरिनाम सप्ताहाला २० फेब्रुवारीपासून प्रारंभ झाला असून, बोरगाव (बु)-बोरगाव मठ बोरी बोरगाव वाडी या गावातील नागरिकांनी एकत्र येत अखंड हरिनाम सोहळा आयोजित केला आहे. या सोहळ्यात दररोज कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून हरहर महादेवाचा गजर होत आहे. भाविकांच्या अलोट गर्दीमुळे वातावरण भक्तिमय झाले आहे. या सोहळ्याला ह.भ.प.निवृत्ती महाराज कोरडे, ह.भ.प लक्ष्मीताई महाराज काळे, ह.भ.प प्रकाशबुवा जवंजाळ, ह.भ.प श्याम महाराज डाखोरकर, ह.भ.प भागवताचार्य साक्षी अपार, ह.भ.प गजानन महाराज आसाबे, ह.भ.प. रामायणाचार्य सतीश महाराज डोईफोडे यांच्या कीर्तनाचे आयोजन व ह.भ.प प्रवीण महाराज गोसावी (शांतिब्रह्म नाथ महाराजांचे तेरावे वंशज) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

या भक्तिमय सोहळ्यात भाविकांना सकाळ, दुपार, संध्याकाळ अन्नदात्यांकडून भोजनाची व चहा पाण्याची व्यवस्था केलेली आहे. २७ फेब्रुवारी रोजी काल्याचे कीर्तन झाल्यानंतर महाप्रसादाने समारोप होणार आहे. परिसरातील भाविक, भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती आयोजकांच्या वतीने करण्यात आली आहे.

# तरुण पिढीने शिवविचार आत्मसात करून आदर्श जीवन जगावे - रामदास शेळके

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** आजच्या तरुण पिढीने कसल्याही संकटापुढे हतबल न होता नेहमी शिवचरित्र डोळ्यासमोर ठेवून शिवविचार आत्मसात करून आदर्श जीवन जगावे असे प्रतिपादन प्रा रामदास शेळके यांनी केले. खानापूर ता.जाफराबाद येथे शिवजयंती निमित्त आयोजित व्याख्यानात त्यांनी हे विचार मांडले.यावेळी श्री शेळके पुढे म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांच्या चारित्र्याची, न्यायाची रयतेमध्ये मोठी ख्याती होती, या न्यायामुळे तसेच राजे रयतेला एवढा जीव लावत की,ज्या वेळी जीवावरचा प्रसंग आला तर मावळे स्वतः मरणाच्या दारात उभे राहत आणि म्हणत राजे लाख मेले तरी चालेले पण लाखाचा पोशिंदा जगला पाहिजे. हे ब्रीद वाक्यच मावळ्यांच्या जणू हृदयातच कोरले होते. तरुणांनी शिवरायांच्या वेशभूषेची, दाढीची, चंद्रकोरेची कॉपी न करता खऱ्या अर्थाने शिवरायांनी जे चारित्र्य निर्माण केलेले आहे त्याची कॉपी करायला हवी तरच खऱ्या अर्थाने आपली ही शिवजयंती साजरी होईल असे ही ते म्हणाले. तरुण वर्गाने डी. जे. वरती शिवराय डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा त्यांचे विचार डोक्यात घेऊन आचरण करावे असेही ते म्हणाले. शिवजयंती उत्सव समिती आयोजित व्याख्यान आणि सार्वजनिक पूजन सोहळा मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. यावेळी पुरुष, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# जालना समाजकार्य महाविद्यालयात संत गाडगेबाबा यांना अभिवादन




**जालना । प्रतिनिधी -** दि. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी कर्मवीर प्रतिष्ठान संचलित जालना समाजकार्य महाविद्यालयांमध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने संत गाडगेबाबा यांना जयंती च्या निमित्ताने अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. दिपक बुक्तरे हे उपस्थित आहे. यावेळी प्रा. डॉ. दिपक बुक्तरे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी शिवाजी भुतेकर, गणेश शेजूळ, गोपाल डोंगरे आदी उपस्थित होते.

# माजी सभपती लक्ष्मण दळवी यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जाफ्राबादच्या वतीने सत्कार





**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जालना जिल्हा अध्यक्ष माजी आमदार अरविंद चव्हाण यांनी माजी सभापती लक्ष्मण दळवी यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी भोकरदन- जाफ्राबाद विधानसभा अध्यक्ष पदी नियुक्ती केली आहे.

दळवी यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या वतीने पंचायत समितीच्या जुन्या सभागृहत उत्स्फूर्त सन्मान पूर्वक सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष दत्तू पाटील अंभोरे यांनी आपले विचार मांडले त्यांनी सांगीतले जफ्राबाद, व भोकरदन तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रत्येक गावात कार्यकर्त्यांना सोबत घेऊन वीकास कामे करणार आहे. माजी जि. प. सदस्य लक्ष्मण पाटील दळवी यांची दोन्ही तालुक्यात मोठी ओळख आहे याचा पक्षाला निश्चितच खूप फायदा होईल यात तिळमात्र शंका नाही.

या वेळी लक्ष्मण दळवी यांनी सांगितले की राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे एक वचनी आहे ते विकास कामासाठी खूप निधी देण्याचे काम सध्या करत आहे राज्यात त्यांची चागली ओळख आहे, एकच वादा अजितदादा , या वेळी माजी नगरसेवक फारुख कुरेशी,विद्यार्थी काग्रेसचे ज्ञानेश्वर पाटील गाडे, संजय पाटील अंभोरे आदींची उपस्थिती होती.

# बालसाहित्यात मोलाचे योगदान देणारे ज्येष्ठ बालसाहित्यिक; शं.ल. नाईक

ज्येष्ठ बालसाहित्यिक शं.ल. नाईक हे बालकविता लिहिण्यात रममाण होतात. त्यांची पुस्तके वाचताना मुलांना खूप आनंद होतो. मुलं त्यांच्या कविता पुन्हा पुन्हा वाचतात. वाचून मनसोक्त आनंद लुटतात. याचं कारण नाईकांनी मुलांच्या मानसिकतेचा अभ्यास केला आहे. ते स्वतः शिक्षक हाते. त्यांना मुलांना काय आवडते काय आवडत नाही हे चांगलं समजते. त्यांच्या कवितेची वैशिष्टये म्हणजे सहजोच्चारी शब्दरचना, शब्दलयीचे सुंदर भान आणि मोहक फॅंटसी.

त्यांची आजपर्यंत एकूण बारा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. शाळा १) गंमत नगरी (२) प्राण्यांची ३) सोनी मोनी ४) नदी किनारी ५) माकडोबाची वरात ६) डोंगर झाडीत ७) पिल्लू ८) सुंदर भारत घडवू ९) मुलं थोडी संसारात गोडी १०) छान छान कोडी ११) कोडी ओळखा कोडी १२) कोडी सोडवा चित्रे रंगचा त्यांच्या एका गीताची ध्वनीफितही निघाली आहे. त्या गीताचे नाव आहे. जीवन सुंदर करू! त्यांच्या पाच कविता डॉ. विजयावाड यांच्या बालकोशात व चार कविता डॉ. मंगलाताई वरखेडे यांच्या बालकोशात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. ही फारच अभिमानाची गोष्ट आहे. त्यांच्या बऱ्याच कविता संस्कार देणाऱ्या आहेत. त्यांच्या काही कविता मराठी सुगमभारती इयत्ता पाचवी, सहावी व आठवीच्या पाठ्यपुस्तकात घेण्यात आल्या आहेत. त्यांच्या साहित्याची भाषा सोपी असून मुलांना समजेल अशी आहे. त्यांचा एक चांगले कवी म्हणून लौकिक आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट बालवाङ्मय निर्मितीचा 'बालकवी' पुरस्कार सन २०१६ ला मिळाला आहे तसेच इतर संस्थाचेही अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. कार्यक्रमातून ते मुलांना हसा, खेळा, नाचा! खूप खपू वाचा!! असा संदेश देतात.

वर्षानुवर्षे लहान मुलांसाठी सातत्याने दर्जेदार लेखन करणारे शं.ल. नाईक हे मुलांचे आवडते बालसाहित्यिक आहेत. 'किशोर', 'सवंगडी', 'मुलांचे मासिक', आणि इतर बालसाहित्यिला वाहिलेल्या मासिकातून त्यांनी खूप लिखाण केले आहे. बी.ए. प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमात त्यांची एक कविता समाविष्ट करण्यात आली आहे. त्यांच्या लिखाणाचा दर्जा अतिशय उत्तम आहे. विविध वृत्तपत्रे, नियतकालिके यातूनही त्यांचे लेखन चालू आहे. पाचवीच्या स्कॉलरशिपच्या पाठ्यपुस्तकातही त्यांच्या काही कवितांचा समावेश करण्या आला आहे.

बालकवितांची रचना हा छंद जोपासणाऱ्या नाईक गुरुजींनी संस्काराचे व मनोरंजनाचे महत्व ओळखले आहे. गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी शेकडो बालकविता लिहिल्या आहेत. हजारो बालकांना आपल्या काव्यवाचनातून हसायला व बोलायला लावले आहे. बालसंस्काराचे धाराव्रत घेतलेल्या नाईक गुरुर्जीना मुलांना संस्कार देण्याची आवड आहे. त्यांनी आजन्म बाल वाडमय समृध्द करण्याचा वसा घेतला आहे, म्हणून त्यांच्या हातून चांगले लेखन झाले आहे.

करी मनोरंजन जो मुलांचे
जडेल नाते प्रभुशी तयांचे

असा आशीर्वाद पुज्य साने गुरुजींनी तमाम साहत्यिकांना देऊन ठवेला आहे. अर्थात बालसाहित्यिकांना. श्यामची आई या पुस्तकातून गुरुजींनी संस्काराचे बीजारोपन केले. त्याचा आता वटवृक्ष फोफावला आहे. गुरुजींचा आशीर्वाद घेऊन महाराष्ट्रात हजारो हात लिहिते झाले. विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या पिढ्या घडत आहेत. खास करून बालकुमारांसाठी ज्यांनी आपली लेखणी झिजवली त्यात मराठवाडयात एक नाव ठळकपणे समोरे येते ते शं.ल. नाईक यांचे.

शं.ल. नाईकांच्या बालकवितेबद्दल निःसंदिग्धपणे असे म्हणता येईल की, ती कुठल्याच अर्थाने पराभूत नसून अस्सल देशी आहे. नाईकांच्या कवितेत जे काही आहे ते गुणदोषासहीत त्यांचे स्वतःचे आहे. 'झाडाचं मूल' ही कविता पहा.

डोळे उघडून म्हणालं फूल,
झाडाचं मी आहे मूल !
अंगावर माझ्या कपडे रंगीत,
वाऱ्याचं मी ऐकतो संगीत !
फुलपाखरं मला भेटायला येतात,
भोवती भुंगे गाणी गातात !
उन्हात मी मांडतो खेळ,
मजेत जातो सारा वेळ !
झाडाच्या मी खांदयावर बसतो,
आनंदानं मी गालात हसतो !

मुलांना आवडावी अशीच किती सुंदर कविता आहे. कळीचं फूल होणं म्हणजे कळीने डोळे उघडणं, फुलावरचे नाना विविधरंग म्हणणे फुलांनी परिधान केलेले रंगीबेरंगी कपडे. बाकीची मुलं उन्हात खेळत नाहीत, पण फुल मात्र आपला खेळ उन्हात मांडूनही अम्लान राहतात. झाडाच्या वरचा भाग, फांदया म्हणजे झाडाचा खांदा, लहान मुलांना प्रौढांच्या खांदयावर बसायला आवडते. तर फुलं झाडाच्या खांदयावर बसतात. हास्य फुलांच्या गालावर फुलतं तर कळी हसून फूल होते, असे कितीतरी सुंदर अर्थ या कवितेतून ध्वनीत होतात. बालकांसाठी लिहित असतांना साहित्यिकांना बालक होऊन जगावं लागते. त्यांच्यासोबत फुलापाखरू होऊन बागेत बागडावं लागते. त्याच्या बालविश्वातील निरागसपणा नेमका पकडून चालत नाही तर त्यांच्या सोबत निरागस बालक व्हावं लागतं, तेव्हा कुठे बालसाहित्यिकांची निर्मिती होऊ शकते. पानांची खळखळ, पाण्याची खळखळ, पक्ष्यांचा चिवचिवाट, आकाशनील पांढरे बगळे, निळे आकाश, मऊ मुलायम कापूस, धुंद करणारा वारा, रंगीबेरंगी पतंग, उंचच उंच हिरवंगार डोंगर, नागमोडी वाट, नागिणीसारखी वळणे घेत पळणारी नदी, गर्द झाडी, किर्र अंधार, निसर्गातील विविध रूपे कवीला नेहमी खुणावत असतात. चिमणी, साळुंखी, राघु मैना, खारूताई, ससा, उंदीर मामा, मनीताई, गाय वासरू, सिंह, वाघ, अस्वल, हुशार कोल्हा, दगाबाज लांडगा, हत्ती, जिराफ, उंट, कासव अशा पशुपुक्षी प्राण्यांना बोलतं करण्याची किमया बालसाहित्यिकांकडे असते. लहानशा मुलांपुढे अवघे विश्व जीवंत करतो ती जादुगिरी बालसाहित्यिकांच्या लेखनात असते. ती शं.ल. नाईक यांच्या लेखनात लिलया अवरतली आहे.

# क्रांतीसुर्य ज्योतीबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त २ मार्चला बैठक

**जालना । प्रतिनिधी** - क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची १९८ वी जयंती व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ व्या जयंतीनिमित्त जूना जालना, सावता माळी सभागृह, राजारामनगर जालना शहर महापालिकेच्या पाठीमागे जालना येथे दि. २ मार्च २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीत महात्मा फुले जयंती व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त व्याख्यानमाला, महात्मा फुले यांच्या जीवनावर नाट्यस्पर्धा, महात्मा फुले यांच्या जीवनचरित्र्यावर पोवाडे, लाडु वाटप आदि विविध कार्यक्रम राबविण्याबाबतच्या नियोजनासाठी बैठक बोलविण्यात आली आहे. यावेळी महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याबाबत व ओबीसीला समाजाला सावित्री आई घरकुल योजना लागु करावी, यासाठी मागणी करण्यात येणार आहे. तसेच माळी समाजासाठी सावित्रीआई फुले महामंडळ स्थापन करायचे याबाबत चर्चा करण्यात येणार आहे. तसेच महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी व मद्यपान बंद ठेवावे आदिबाबत चर्चा करण्यात येणार आहे.



या बैठकीस अखिल भारतीय महात्मा समता परिषद सर्व पदाधिकारी, सदस्य, माळी महासंघ, सर्व पदाधिकारी, सदस्य, सावता परिषद सदस्य पदाधिकारी, आंबेडकर अनुयायी, ओबीसी समाजातील पदाधिकारी, भटक्या, व्हिजेएनटी, एनटी पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन भास्करराव अंबेकर, अश्विन अंबेकर, बाबासाहेब शिवाजी वानखेडे, डॉ. विशाल धानुरे, प्रा. राजेंद्र जाधव, अमोल धानुरे, गोकुळ स्वामी, दीपक वैद्य, सुधाकर निकाळजे, शेख इब्राहिम, सुनिल रत्नपारखे, शिवलाल अक्षय, बाबा पठाण, सुरेश रत्नपारखे, संतोष जमधडे, अमरदीप शिंदे, नितीन तायडे, मधुकर झरेकर, सुंदरराव कुदळे, बाबासाहेब सोनवणे, योगेश रत्नपारखे, निखील पगारे, गजानन खांडेभराड, राजेंद्र शिंदे, स्वप्नील गायकवाड, संदीप हिवराळे, इब्राहिम शेख, गणेश तरासे, बाबुराव मामा सतकर, बबनराव खरात, सर्जेराव शेवाळे, सागर राऊत, सुधाकर खरात, प्रभाकर घडलिंग, संतोष खरात, राहुल रायकर, नंदकुमार जाधव, देवनाथराव जाधव, डॉ. सुशिल धानुरे, डॉ. श्रावण शेवाळे, रामदास शेवाळे, बाबासाहेब खरात, विशाल वाघमारे, सदाशिव वाघमारे, बाबासाहेब गाडेकर, प्रभाकर खरात, संजय खरात, मदन खरात, बंडु पाऊलबुध्दे, शिवनाथ पाऊलबुध्दे, विलास राऊत, संतोष राऊत, रमेश मुळे, रामेश्वर गाडेकर, अर्शद बागवान, बाळु देशमुख, किशोर मघाडे, सचिन पगारे, बाबासाहेब गाडेकर, दत्ता खांडेभराड, वैजीनाथ नागरे, ॲड. रामेश्वर खांडेभराड, परमेश्वर खांडेभराड, अनिल वाघमारे, ॲड. राजाळे, ॲड. दैणे, लक्ष्मण इधाटे, शिवाजी घायाळ, बंडु जाधव, शंकर घोडके, शंकर सातपुते, ऋषीधंर राऊत, निलेश वानखेडे, सचिन जैवळ, सचिन वानखेडे, दिलीप पाऊलबुध्दे, सतीश खांडेभराड, पंडीत जाधव, जनार्धन जाधव, आशिष वैद्य, लक्ष्मण गडकरी, रमेश गडकरी, गोविंदराव बारवकर, अशोक खांडेभराड, नितीन इंगळे, धरम इंगळे, रामभाऊ जाधव, सय्यद अखिल, महेंद्र शिंदे, आसाराम राठोड, सलमान शेख, मुस्ताक बेग (जॉनी), बाबासाहेब खांडेभराड, फुलझाडे, रघुनाथ मगर, सुरेश दांडगे, दगडु बडदे, राहुल मुळे, प्रा बुलबुले, शिवलाल घाडगे, सतिश फत्तेपुरीये, सिध्दार्थ पवार, गणेश जाधव आदिंनी केले आहे

# जालन्यात वडेट्टीवार यांच्या विरोधात मोर्चा

## जगदगुरु नरेंद्र रामानंदाचार्य महाराज यांचा एकेरी उल्लेख केल्याने निषेध

**जालना । प्रतिनिधी** - जगदगुरु नरेंद्र रामानंदाचार्य महाराज यांचा एकेरी उल्लेख केल्याबदल जालन्यात काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांचा निषेध नोंदवण्यात आलाय.वडेट्टीवार यांच्या वक्तव्याचा निषेध नोंदवण्यासाठी आज दिनांक २४ सोमवार रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास जालन्यात गांधी चमन येथून मोर्चा काढण्यात आला.शहरातील गांधी चमन, शनी मंदिर नूतन वस्ताद अंबड चौफुली चौकापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात येऊन हा निषेध नोंदवण्यात आला.नरेंद्र महाराज यांच्या भक्तांनी हा मोर्चा काढत या मोर्चात सहभाग नोंदवला .यावेळी वडेट्टीवार यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली. यावेळी भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




# मंठा येथे श्रेया इंटेलिजंट अकॅडमी सर्च परीक्षा सुरळीत

**मंठा । प्रतिनिधी** - ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची गोडी लागावी यासाठी नवोदय, स्कॉलरशिप, MPSC-UPSC च्या धर्तीवर घेतली जाणारी श्रेया इंटेलिजंट अकॅडमी सर्च परीक्षा आज न्यु इंग्लिश स्कुल अँड ज्युनियर कॉलेज मंठा येथे सुरळीत पार पडली.



या परीक्षेला गट समन्वयक के.जी.भाऊ राठोड,केंद्रप्रमुख शिवाजीराव देशमुख,पत्रकार रवी भैय्या भावसार,अशोका पब्लिक स्कुल चे संस्थापक अध्यक्ष चव्हाण सर, शेंडगे सर,प्रा. गोपल उध्दवराव जाधव,मोरे सर,दिपाली मॅडम,उपस्थित होत्या,टॅलेंट चा शोध घेणाऱ्या या परीक्षेचा अनुभव मंठा तालुक्यातील इ.२ री ते ७ वी च्या २०४ विद्यार्थ्यांनी घेतला. यामध्ये यामध्ये मॉडर्न इंग्लिश स्कुल व जि.प.प्रा. शा.हिवरखेडा,ठेंगेवडगाव शाळेचा सहभाग उल्लेखनीय होता. यासोबत अशोक पब्लिक स्कुल,जि. प.प्रा.शाळा विडोळी (तो.), गेवराई, ब्राईट स्टार इंग्लिश स्कुल,गुरुकुल इंग्लिश स्कुल,न्यु इंग्लिश स्कुल,स्वामी विवेकानंद शाळा,या तसेच,द वर्ल्ड इंग्लिश स्कुल,आदि शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# जेईएस महाविद्यालयात जागर ज्ञानेश्वरीचा कार्यक्रम

**जालना । प्रतिनिधी** - मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल या वर्षापासून दि.२७ फेब्रुवारी रोजी, मराठी भाषा गौरव दिन व कुसुमाग्रजांच्या जयंतीनिमित् ' जागर ज्ञानेश्वरीचा' हा कार्यक्रम दर गुरुवारी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला आहे .



हा अभिनव उपक्रम ,वर्षभर ५२ आठवडे हा कार्यक्रम अखंडपणे सुरू राहणार असून, यामध्ये ज्ञानेश्वरी च्या एकूण १८ अध्यायांचे वाचन-प्रवचन होणार आहे. दर गुरुवारी ज्ञानेश्वरीतील ओवींवर मराठीतून प्रवचन होणार आहे.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होणार असून, मराठी विभागाचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे, प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले.

युवा आदर्श

**अभ्यागत ...**

करा वाजत गाजत
आयारामांचे स्वागत
आपल्या पक्षा आले
घरचा बने अभ्यागत
गद्दार जरी तिकडचे
इथे आणले वाजवत
म्हणू नका बंडखोर
दिशा दाही गाजवत
त्यागला जुनाट पक्ष
जरी नव्हता सोडवत
जातो म्हणे कितीदा
कुणी नव्हते अडवत
अन्याय केला तिकडे
ढोल बसावे बडवत
सत्ता दे मुला-मुलीला
ठेवले आम्हां सडवत
निघून गेले सारसारे
बसा लोणी कढवत
चक्री धरायला आम्ही
ते पतंग राही उडवत
साठमारी नीत रंगते
प्याद्या ठेवा लढवत
जीवंता नाही किंमत
कलेवरा बरे मढवत
साक्षात पडे पायाशी
मुर्त्या बसला घडवत
लिलाव केला अश्रूंचा
सोडता नाही रडवत

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.